# BDC LIBRARY

## New Paper Clipping

### A.Y. 2024-2025

# विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकसित होणे आवश्यक

## याझसेन पाटणकर यांचे प्रतिपादन, बाळासाहेब देसाई कॉलेजमधील रोजगारवर्धन कार्यक्रम

वार्ताहर

पाटण

सध्याच्या जागतिकीकरणाच्या काळात रोजगाराच्या संधीचे स्वरूप बदलले आहे. रोजगाराच्या नवनवीन संधीबाबत माहिती नसल्याने किंवा आवश्यक कौशल्य नसल्याने विद्यार्थी रोजगार किंवा उद्योगापासून वंचित राहत आहेत. त्यामुळे महाविद्यालयात विविध उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकसित होणे आवश्यक आहे, असे मत कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक याझसेन पाटणकर यांनी व्यक्त केले.

कोयना एज्युकेशन सोसायटीच्या येथील बाळासाहेब देसाई कॉलेज अंतर्गत आयक्यूएसी विभाग, लैंगिक छळ प्रतिबंधक समिती आणि नांदी फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रोजगारवर्धन आणि युवा उपजीविका कार्यक्रम महिंद्रा प्राईड क्लासरूमतर्फे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. डी. पवार होते.



पाटण : कार्यक्रमात बोलताना याझसेन पाटणकर.

पाटणकर म्हणाले, आताच्या ऑनलाइन युगात मोबाईलचा वापर अनिवार्य आहे. परंतु तो शिक्षणासाठी जास्तीत जास्त वापर करावा. माहितीची देवाण-घेवाण करण्यासाठी ईमेलचा वापर करावा.

प्राचार्य डॉ. पवार म्हणाले, कौशल्यावर आधारित शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. नियमित अभ्यासक्रमाबरोबर विद्यार्थ्यांनी वेगवेगळी कौशल्ये आत्मसात केली, तर त्यांचा निश्चितच फायदा होतो. महाविद्यालयात असे विविध करिअर कोर्स सुरू आहेत. विद्यार्थ्यांनी त्यामध्ये सहभागी व्हावे.

विद्यार्थिनींनी कोर्सवर आधारित लघुनाटिका सादर केल्या. त्यानंतर नांदी फौंडेशनच्या स्वाती मोरे यांनी आठ दिवस सुरू असलेल्या कौशल्याधिष्ठित कोर्सची थोडक्यात माहिती दिली. आसावरी कुलकर्णी यांनी नांदी फौंडेशन व महिंद्रा प्राईडच्या उपक्रमांची माहिती दिली. प्रा. डॉ. कुमार यांनी प्रास्ताविक, विशाखा गुजर हिने आभार मानले. भाग्यश्री शिंदे व काजल पवार यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी स्वाती मोरे, आसावरी कुलकर्णी, आयक्यूएसी समन्वयक प्रा. डॉ. एच. व्ही. काटे, प्रा. डॉ. एस. एस. कुमार, प्रा. एम. एस. आलदार, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.